# नवहितगुज वार्ता

पान नं. १/६

नाशिक - मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५


# नवहितगुज महिला मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील नवनिर्वाचित कार्यकारीणीचा पदग्रहण सोहळा व माजी अध्यक्षांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

बातमी नाशिक समाज प्रतिनिधी - नाशिक स्थित ५० वे वर्ष साजरे करीत असलेल्या नवहितगुज महिला मंडळाच्या नवनिर्वाचित कार्यकारीणीचा पदग्रहण सोहळा व मागील ५० वर्षातील माजी अध्यक्षांचा सन्मान सोहळा संपन्न झाला.

विशेष म्हणजे ५० वर्षांपूर्वी मंडळाचे अध्यक्षपद ज्यांनी भुषविले होते, त्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती नंदाताई सुधाकर शिरोडकर ह्यांचेसह एकुण २० माजी अध्यक्षा ह्या सोहळ्यास उपस्थित होत्या.सर्व प्रथम कार्यकारीणीतील सदस्यांचे व माजी अध्यक्षांचे जोडीसह औक्षण करण्यांत आले..

तदनंतर मान्यवर प्रमुख अतिथि श्री. गिरीश मालपुरे , पदग्रहण अधिकारी श्री. अभय बाग व संस्थापक अध्यक्षा नंदाताई शिरोडकर व मंदाकीनी खुटाडे यांचे सह नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. संध्या राजेश कोठावदे, मावळत्या अध्यक्षा सौ.उज्वला कोठावदे, उपाध्यक्षा सौ. प्रतिभा वाणी, सचिव सौ.प्रणाली बागड, सह-सचिव,सौ.चारूलता शिरोडे, खजिनदार सौ.रूपाली येवले, सह-खजिनदार सौ.लीना बागड, श्री. मधुकर ब्राम्हणकर, श्री. चंद्रकांत धामणे ह्या मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरूवात झाली..सौ. संध्या राजेश कोठावदे यांचे नेतृत्वात नविन कार्यकारीणीचा

### सौ. संध्या कोठावदे

नुतन अध्यक्षा सौ संध्या कोठावदे यांनी महिला संघटन, महिला सक्षमीकरण .. याबाबत समाजाला बोधप्रत विचार व्यक्त केले. लवकरच १०० महिलांना शिलाई मशीन चालविण्याचे प्रशिक्षण देवुन त्यांतील गरजु महिलांना शिलाई मशीन भेट देणार असल्याचे सांगितले.. यासाठी उपस्थित महिलांमधुनच २५ जणींनी शिलाई मशीनसाठी आर्थीक सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.. खरोखर समाजाला दिशा देणारा विचार वाटला..



पदग्रहण सोहळा नाविण्यपुर्ण पद्धतीने पदग्रहण अधिकारी श्री. अभय बाग सर यांचे हस्ते संपन्न झाला. त्यांनी प्रत्येकास आपल्या पदाची जबाबदारी समजावुन सांगितली. प्रमुख अतिथी समाजाध्यक्ष श्री. गिरीषजी मालपुरे यांनी नविन कार्यकारीणीस शुभेच्छा देवुन समाजाभिमुख कार्य करण्याविषयी मार्गदर्शन केले. सुवर्ण महोत्सव साजरे करीत असतांना समाजातील महिला सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने सातपुर (ध्रुवनगर) मधील भगिणी सौ. सुवर्णा अतुल गहिवड यांना स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहन म्हणुन शिलाई मशीन भेट देण्यांत आले, ह्या पहिल्या शिलाई मशीनचे योगदान स्वताहुन सौ चित्रा व श्री देविदास (नाना) नरहर केठावदे यांनी स्वीकारले व एक वेगळा आदर्श समाजासमोर ठेवला.. ह्या उपक्रमास साथ देण्यासाठी सभागृहांत उपस्थित असलेल्या २५ जणांनी हात वर करुन आर्थीक योगदान देण्याची तयारी दर्शविली.. खरोखर भारावलेला क्षण अनुभवला व यांतुन लक्षांत आले, समाजातील महिलांचे सक्षमीकरण करणे, हेच समाजातील महिला मंडळाकडून अपेक्षीत आहे..समाजातील महिला मंडळाने, समाजातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी, समाजातील सक्षम महिलांच्या माध्यमातुन उचललेले पाऊल बघुन उपस्थितांपैकी अनेकांच्या अंगावर शहारे आले.. लवकरच आपण गरजु महिलांना स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी शिलाई मशीन चालविण्याचे प्रशिक्षण देवुन शिलाई मशीन भेट देणार असल्याचे नवनिर्वाचीत अध्यक्षा सौ. संध्या कोठावदे यांनी मनोगतात सांगितले.तदनंतर नवहितगुजचा प्रवास सुवर्ण महोत्सवी वर्षपुर्तीचा,ह्या ई-पुस्तकाचे प्रकाशन सौ मालतीताई ब्राम्हणकार व लता उद्धव वाणी यांचे हस्ते संपन्न झाले सर्व माजी अध्यक्षांनी सन्मान केल्याबद्दल समाधान व आनंद व्यक्त केला, त्यातील ८ माजी अध्यक्षांनी आनंदमय मनोगत व्यक्त करुन नविन कार्यकारीणीस शुभेच्छा दिल्या.नासिकमधील १४ विभागीय महिला मंडळाच्या पदाधिकारी तसेच समाजातील संस्थाचे अध्यक्ष, पदाधिकारी आदी मान्यवर ह्या सोहळयांस उपस्थित होते.

### गिरीषजी मालपुरे

प्रमुख अतिथी समाज अध्यक्ष श्री गिरीषजी मालपुरे यांनी नुतन कार्यकारीणीला मार्गदर्शन करतांना सांगितले की, महिला वर्गासाठी एक ट्रेनिंग सेशन घ्या , ज्या मध्ये ऑनलाईन लांईटबिल भरणे, घरपट्टी भरणे यासारख्या गोष्टींचा समावेश असेल..

### नंदाताई शिरोडकर

त्यांनी संस्था स्थापन करतांनाचा इतिहास थोडक्यात सांगितला व आपल्याला पर्यावरण संवर्धनासाठी काही कार्य करता आले, तर अवश्य करा.. याबाबत मार्गदर्शन केले




### आवाहन

महाराष्ट्रात समाजातील हजारो महिला विवीध महिला मंडळाच्या माध्यमांतुन गरजयुक्त समाजकार्य करीत आहेत, त्यातुंन प्रत्येक गावांत, प्रत्येक शहरांत महिलांचे संघटन मजबुत झालेले आहे, हे खरोखर कौतुकास्पद आहे. आता ह्या महिला मंडळानी समाजात अनेक महिला ज्या गरजु असुन परीतक्त्या, अनाथ, विधवा आहेत, त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने पुढे आले पाहीजे, गरजु महिलांना आर्थीक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे, शक्य असल्यास त्यांना स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करा, सक्षम महिलांकडुनच आर्थीक योगदान उपलब्ध करुन गरजु महिलांना व्यवसायासाठी सुरुवातीची गरज भागवून त्यांना स्वताच्या पायावर उभे करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे, महिला मंडळांनी, समाजातील महिलांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहीलेतर समाजकार्य करीत असल्याचा आनंदही मिळेल, त्यासोबतच समाजाची अप्रत्यक्ष गरजही पुर्ण होईल, असा विचार राजेश कोठावदे यांनी बोलुन दाखविला.



नुतन अध्यक्षा सौ. संध्या कोठावदे व कार्यकारिणी यांच्या वैचारिकतेने सुवर्ण महोत्सव साजरे करीत असतांना समाजातील महिला सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने सातपुर (ध्रुवनगर) मधील भगिणी सौ. सुवर्णा अतुल गहिवड यांना स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहन म्हणुन शिलाई मशीन भेट देण्यांत आले. त्या प्रसंगी प्रयोजकत्व स्वीकारणारे सौ. चित्रा व देविदास कोठावदे, अध्यक्षा सौ. संध्या कोठावदे, प्रमुख अतिथी श्री. गिरीश मालपुरे व पदग्रहण अधिकारी श्री. अभय बाग. सौ. सुवर्णा अतुल गहिवड हया शिवणकामे गोळा केल्या नंतर शिलाई मशीन भाड्याने आणुन शिवणकाम करीत होत्या. ह्या उपक्रमामुळे त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.




नुतन कार्यकारिणी व माजी अध्यक्षा श्रीमती नंदाताई सुधाकर शिरोडे, श्रीमती मंदाकिनी प्रभाकर खुटाडे, श्रीमती लता उद्धव वाणी, सौ. मालती मधुकर ब्राम्हणकार, सौ. निता जयंत वाणी,सौ. अलका राजेंद्र कसोदेकर,श्रीमती रजनी भगवान खैरनार,सौ. अनुराधा अरविंद अमृतकर,श्रीमती मालती भास्कर कोठावदे, सौ. उज्वला शरद वाणी,सौ. संजिवनी अनंत बागडे, श्रीमती पुष्पलता लक्ष्मण दशपुत्रे,सौ. मनिषा वसंत शिरोडे, सौ. विद्या घनःश्याम कोठावदे, सौ. स्वाती अशोक ब्राम्हणकार, सौ. आशा सुनिल मुसळे, सौ. सुचित्रा राजेंद्र वाणी, सौ. चित्रा देविदास कोठावदे, सौ. उज्वला अशोक कोठावदे



पदग्रहण सोहळ्या नंतर निवडपत्रासह नुतन कार्यकारिणी डावीकडुन निमंत्रीत संचालीका सौ.सुनंदा वसंत दशपुते, निमंत्रीत संचालीका सौ.मोनाली प्रशांत अमृतकार, संचालीका सौ.प्रांजल पंकज कोठावदे, संचालीका सौ.पल्लवी राहुल वेढणे, संचालीका सौ.सरिता संजय शिरोडे, संचालीका सौ.ज्योत्सना रमेश मोराणकर, संचालीका सौ.सिमा प्रशांत सोनजे, खजिनदार सौ.रुपाली मनिष येवले, सचिव सौ.प्रणाली प्रसाद बागड, अध्यक्षा सौ.संध्या राजेश कोठावदे, उपाध्यक्ष सौ.प्रतिभा विवेक वाणी, सल्लागार सौ.उज्जवला अशोक कोठावदे, सहसचिव सौ.चारुलता मनोज शिरोडे, सहखजिनदार सौ.लिना सचिन बागड, सल्लागार सौ.चित्रा देविदास कोठावदे, संचालीका सौ.रुपाली नंदकिशोर वाणी, संचालीका सौ.सारिका योगेश राणे, संचालीका सौ.नयना लक्ष्मण अमृतकार, निमंत्रीत संचालीका सौ.वैशाली विनायक कोठावदे

# नवहितगुज वार्ता

पान नं. २/६

नाशिक - मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५


## मान्यवरांचे औक्षण करतांना













प्रमुख अतिथी श्री. गिरीश मालपुरे व पदग्रहण अधिकारी श्री. अभय बाग व श्री जितेंद्रजी येवले यांचा सत्कार करतांना अध्यक्षा सौ.संध्या राजेश कोठावदे, उपाध्यक्ष सौ.प्रतिभा विवेक वाणी

## कार्यकारिणीचे औक्षण करतांना






















प्रमुख अतिथि श्री. गिरीश मालपुरे , पदग्रहण अधिकारी श्री. अभय बाग व संस्थापक अध्यक्षा नंदाताई शिरोडकर व मंदाकीनी खुटाडे यांचे सह नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. संध्या राजेश कोठावदे, सौ.उज्वला कोठावदे, सौ. प्रतिभा वाणी, सौ.प्रणाली बागड,,सौ.चारूलता शिरोडे, सौ.रूपाली येवले, सौ.लीना बागड, श्री. मधुकर ब्राम्हणकर, श्री. चंद्रकांत धामणे ह्या मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरूवात झाली

# नवहितगुज वार्ता

पान नं. ४/६

नाशिक - मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५


## माजी अध्यक्षांचे औक्षण करतांना

















# नवहितगुज वार्ता

पान नं. ५/६

नाशिक - मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५

## समाजातील संस्थाचे अध्यक्ष, पदाधिकारी आदी उपस्थित मान्यवर



















नवहितगुजचा प्रवासा,ह्या ई-पुस्तकाचे प्रकाशन सौ.संध्या राजेश कोठावदे, श्रीमती नंदाताई शिरोडे, सौ मालतीताई ब्राम्हणकार, लता उद्धव वाणी, श्री.गिरीश मालपुरे, श्री.अभय बाग, सौ.उज्ज्वला कोठावदे, सौ. प्रतिभा वाणी, सौ.प्रणाली बागड,,सौ.चारूलता शिरोडे,सौ.रूपाली येवले, सौ.लीना बागड यांचे हस्ते संपन्न झाले

# नवहितगुज वार्ता



नाशिक - मंगळवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२५

## माजी अध्यक्ष सन्मान




























































